दाखल दिनांक : २२.०२.२०१३
नोंदणी दिनांक : २२.०२.२०१३
निकाल दिनांक : १५.०३.२०१७
कालावधी : वर्षे महिने दिवस
०३ ०० २१

**पारनेर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांच्या न्यायालयात**
(अ.मा.पाटणकर यांच्यासमोर )

**<u>क्रि.चौ.अर्ज क्र. ३९/२०१३</u>** **<u>नि.क्र.</u>**

१. सौ.वैशाली विनोद कसबे,
वय-२८ वर्षे, धंदा गृहिणी,
२. श्रेयस विनोद कसबे, वय ३ ॥ वर्षे
धंदा काही नाही,
अर्जदार नं. २ ची अ.पा.क. अर्जदार नं.१
रा. करंदी, ता. पारनेर, जि.अहमदनगर **<u>अर्जदार</u>**

**विरूध्द**

१. विनोद हरिभाउ कसबे, वय-३२ वर्षे, धंदा नोकरी,
२. हरीभाउ नथूजी कसबे, वय सज्ञान,
३. नलीनी (लक्ष्मी) हरीभाउ कसबे, वय सज्ञान
४. मनिषा सचिन धरणे, वय २६ वर्षे, धंदा घरकाम,
५. सचिन नारायण धरणे, वय ३४ वर्षे, धंदा नोकरी
सर्व रा. गजानन कॉलनी, चाळ नं. ७, रूम नं.५४,
गोवंडी, मुंबई ४०० ०४३ **<u>सामनेवाला</u>**

**महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम १२, १९, २०, २१, २२ व २३ प्रमाणे अर्ज**

अर्जदारातर्फे विधीज्ञ .... श्री.बी.एम.सोनवणे
सामनेवालांतर्फे .... श्री.एस.बी.शिंदे

**<u>न्यायनिर्णय</u>**
(दिनांक १५ मार्च २०१७)

सदरचा अर्ज अर्जदाराने महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ (यापुढे कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा असा संक्षिप्तासाठी उल्लेख) प्रमाणे दाखल केला आहे.

२. **<u>अर्जदाराचे कथन असे की</u>** :-

अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ हे पती पत्नी असून त्यांचा विवाह दि. ०१.०५.२००८ रोजी पारनेर येथे बौध्द धर्मशास्त्राप्रमाणे झाला. सदर विवाहातुन अर्जदार क्र. १ हिस अर्जदार क्र. २ मुलगा श्रेयस झाला व तो अर्जदार क्र.१ च्या ताब्यात आहे. लग्नानंतर अर्जदार क्र. १ हि नांदण्यासाठी सामनेवाला क्र. १ याचे घरी गेली. सुरुवातीचे एक महिना सामनेवाला यांनी अर्जदार क्र. १ हिस व्यवस्थित नांदवले. त्यानंतर सामनेवाला क्र.२,३ व ४ हे अर्जदार क्र. १ ही घरातील सर्व कामे करत असताना तिच्या कामात चुका काढून तिला त्रास देत असत तसेच कोणतेही कारण नसताना अर्जदार क्र. १ मारहाण व शिवीगाळ करुन पदोपदी अपमान करीत असे. दि. ०४.०१.२००९ रोजी अर्जदार क्र. १ ही गरोदर असताना सामनेवाला यांनी तिच्या तब्येतीची कोणतीही काळजी न घेता तिच्या बरोबर जोरदार भांडण करून तिच्या भावाला बोलावून घेउन एकावस्त्रानिशी तिच्या भावाबरोबर तिला राहत्या घरातुन हुसकावून दिले. दि. १२.०३.०९ रोजी अर्जदार क्र. १ तिचे आई वडिल, मावशी व भाउ यांच्यासोबत पुन्हा सासरी नांदण्यासाठी गेली असता सामनेवाला यांनी रात्री १०.०० वाजता पुन्हा माहेरी पाठवून दिले. दि. २६.०३.०९ रोजी अर्जदार हिने पुन्हा नातेवाईकांसोबत जाउन नांदण्याचा प्रयत्न केला असता सामनेवाला यांनी तिला घरात घेतले नाही. दि. १२.०३.०९ रोजी सामनेवाला क्र.१ याने बांद्रा येथील कौटुंबिक न्यायालयात अर्जदार क्र. १ हिचे विरुध्द लग्नाला एक वर्ष पूर्ण होण्याच्या आगोदरच बेकायदेशीरीत्या घटस्फोटाचा अर्ज दाखल केला. अशाप्रकारे सामनेवाला यांनी अर्जदार क्र. १ हिस शारिरिक व मानसिक त्रास देउन दि. ०४.०१.०९ पासून ती गरोदर असताना तिला घरातुन हाकलून दिले. दि. १४.०७.०९ रोजी अर्जदार क्र. २ चा जन्म झाल्यानंतरही अर्जदार व तिच्या नातेवाईंकांनी नांदण्याचा प्रयत्न केला परंतु सामनेवाला यांनी तिला घरात घेतले नाही.

३. सामनेवाला क्र. १ हा व्होडाफोन कंपनीत नोकरीला असून त्याला दरमहा २५,०००/- रुपये पगार आहे. तसेच सामनेवाला क्र.१ चे वडिलांच्या नावे मुंबई येथे दोन फ्लॅट असून त्याच्यातुन १० ते १५ हजार रुपये भाडे मिळते. तसेच सामनेवाला यांची अपधूप, ता. पारनेर येथे दोन एकर बागायत शेती असून त्यातुन साधारण दोन लाख वार्षिक उत्पन्न मिळते. अशाप्रकारे सामनेवाला यांची सांपत्तिक स्थिती चांगली असून ते अर्जदार क्र. १ व २ यांची अन्नवस्त्राची सोय करण्यास सक्षम

आहेत. तरी अर्जदाराची विनंती आहे की, कलम २० (१) ड प्रमाणे अर्जदार क्र. १ हिला सामनेवाला यांच्याकडून अन्नवस्त्र म्हणून पाच हजार व अर्जदार नं. २ यास ३०००/- रूपये मिळावे, तसेच सामनेवाला यांचे मुंबई येथील फलॅटमध्ये किंवा शेजारी राहण्याची सोय व तेथे राहत असताना सामनेवाला यांच्याकडून मारहाण होउ नये म्हणून संरक्षण मिळावे, तिला केलेल्या शारिरिक व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळावी व सामनेवाला यांनी लग्नात तिला स्त्रीधन म्हणून घातलेले सोन्याचे दागिने परत मिळावेत अशी मागणी केली आहे.

४. सामनेवाला यांनी नि. ६६ वर अर्जाला म्हणणे दिले व अर्जदाराच्या सर्व कथनांचा विरोध केला. सामनेवालांचे म्हणणे असे की अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह परस्पर संमतीने झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार दोन ते तीन महिने व्यवस्थित नांदली. दि. ०१.०७.०८ रोजी अर्जदार आषाढ महिना असल्यामुळे तिचे काका यांच्याबरोबर चेम्बुरला गेली व नंतर एक महिना व दहा दिवसांनी अर्जदाराचे वडिलांनी अर्जदार क्र. १ ला सासरी आणून सोडले. अर्जदार सासरी आल्यावर पोटात प्रचंड दुखत असल्यामुळे सतत रागराग करीत असत, झोपून राहत असत व मनमोकळेपणाने बोलत नसत. अर्जदार क्र. १ मुददाम उशिरा उठत, घरच्यांना उलट पालट बोलून अपमान करीत असत व ‘तुम्ही कमी शिकलेले आहे मी जास्त शिकलेली आहे तुम्ही माझी बरोबर करू शकत नाही, मला जबरदस्तीने लग्न करायला लागलेले आहे’. सामनेवाला यांचे पुढे असे म्हणतात की अर्जदार क्र. १ हिचे जेव्हा दुखत असे तिला मुंबई येथील चांगल्या महागडया दवाखान्यामध्ये उपचार केले असून तिची योग्यप्रकारे काळजी घेतलेली आहे. अर्जदार क्र. १ हिचे वडिलांनी दिवाळी सणासाठी सामनेवाला क्र.१ घरी नसताना न विचारताच माहेरी घेउन गेले व रात्री लगेचच चुलता चुलती यांनी सासरी आणून सोडले. सामनेवाला क्र. १ याने विचारले असता अर्जदार क्र. १ हिने मंगळसूत्र हरविल्याचे सांगितले त्यावरून अर्जदार क्र. १ च्या चुलत्याने सामनेवाला क्र.१ ला झापले. अर्जदार क्र. १ हिच्या वडिलांनी निवडणूक लढवायची आहे म्हणून सामनेवाला यांच्याकडे दोन लाख रुपयांची मागणी केली. सामनेवालांनी नकार दिल्यानंतर अर्जदार क्र. १ हिने दागिने गहाण ठेवण्यासाठी मागितले असता सामनेवालांनी ते दिले नाही व त्यावरून वाद विवाद व भांडणे होत असे. अर्जदार क्र.१ हि सामनेवालांना दागिने दिले नाही तर तुम्हाला खोटया केसेसमध्ये अडकवीन, खडी

फोडायला पाठवीन, बरबाद करीन अशा धमक्या देत असत. दि. ०४.०१.०९ रोजी अर्जदार क्र. १ च्या पोटात दुखत असल्यामुळे सामनेवालांनी दवाखान्यात घेउन जाण्याबाबत विचारले असता अर्जदार क्र. १ हिने तुमच्याबरोबर यायचे नाही व भावाला फोन करून बोलावून घेतले. दि. ०५.०१.०९ रोजी अर्जदार माहेरी निघून गेली व आजतागायत तिकडेच आहे. सामनेवालांनी अर्जदार क्र.१ हिला नांदवण्याचा बराच प्रयत्न केला परंतु तिने प्रतिसाद दिला नाही. याउलट सामनेवाला विरूध्द खोटया आशयाच्या केसेस दाखल केल्या. सामनेवालाचे म्हणणे की अर्जदार क्र. १ ही उच्च शिक्षीत असून तिने मध्यंतरी निवडणूक लढवून करंदी गावात सरपंच पद भूषवित आहे.

५. या अर्जाच्या स्वरूपावरुन या कामी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत आणि त्याचे निष्कर्ष सुसंगत कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे आहेत.

| **अ क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सामनेवाल्यांनी घरगुती हिंसाचार केल्याचे अर्जदाराने सिध्द केले का ? | नाही |
| २ | अर्जदार कौटुंबिक हिंसाचाराच्या कायद्याखाली केलेल्या मागण्या मिळवण्यास पात्र आहे काय ? | नाही |
| ३ | कोणता आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करिता :-

६. अर्जदाराने तिचे पुराव्यचे शपथपत्र नि. ३५ वर दाखल केले. त्यामध्ये अर्जदाराने तिच्या अर्जामधील कथनांचा शपथेवर पुन:उल्लेख केला. अर्जदार यांनी खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली.

१. नि.१८ सोबत रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, आधर कार्डची झेरॉक्स प्रत, अर्जदाराचे कॉलेजचे ओळखपत्र व फॅमिली कोर्ट मुंबई यांचे समोरील मॅरेज पिटीशनची प्रत

२. नि.२९ सोबतचे सात बारा उतारे

३. नि. ५९ सोबत कुर्ला येथील न्यायालयात दाखल केलेली एफ आय आर ची ची प्रत

७. सामनेवाला यांनी नि. ५७ वर त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. याव्यतिरिक्त सामनेवाला यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ सौ. मनिषा सचिन धरणे (नि.६६) या साक्षीदाराला तपासले. सामनेवाला यांनी खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली.

१. सी सी क्र. ७११/०९ मध्ये वैशाली विनोद कसबे यांच्या जबाबाची प्रमाणित प्रत (नि.४१)
२. एम ए क्र. ०४००७६७/११ ची नि.१ ची प्रमाणित प्रत (नि.क्र.४२)
३. एम ए क्र.७६७/२०११ मधील पुरसिस ची प्रमाणित प्रत (नि.क्र.४३)
४. एम ए क्र.७६७/२०११ मधील प्रतिज्ञापत्राची प्रमाणित प्रत (नि.क्र.४४)
५. एम ए क्र.७६७/२०११ मधील अर्ज नि.९ ची प्रमाणित प्रत (नि.क्र.४५)
६. कुर्ला येथे दाखल केलेल्या FIR ची प्रमाणित प्रत (नि.क्र.६८)

८. अर्जदार व सामनेवाला यांनी दाखल केलेले कागदपत्र वाचले. तसेच अर्जदार व सामनेवाला यांच्या विद्वान वकिलांनी केलेला युक्तिवाद ऐकला.

९. अर्जदाराच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की दि. ०१.०५.०८ रोजी लग्नानंतर सामनेवालांनी केवळ महिनाभर तिला व्यवस्थित नांदवले व नंतर त्रास देण्यास सुरूवात केली. घरगुती हिंसाचाराच्या घटना सांगताना अर्जदार म्हणते की सामनेवाले तिच्या कामात चुका काढून तिला त्रास द्यायचे आणि कारण नसताना मारहाण व शिवीगाळ करून पदोपदी अपमान करायचे. ठराविक घटना सांगताना अर्जदाराने दि. ०४.०१.०९ रोजी ती गरोदर असताना सामेवाल्यांनी तिची काळजी न घेता तिच्याशी भांडण केले व एका वस्त्रानिशी तिला भावाबरोबर घरातुन हुसकावून लावले असे म्हटले आहे. त्यानंतर दि. १२.०३.०९ रोजी सासरी जाण्याचा प्रयत्न केला असता सामनेवाल्यांनी रात्री १० वाजता पुन्हा माहेरी हाकलून दिले असे अर्जदार म्हणते. तसेच २६.०३.०९ रोजी देखील नातेवाईकांसोबत सामनेवाल्यांकडे जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी घरात घेतले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्याचबरोबर सामनेवाला क्र. १ याने लग्नाला एक वर्ष होण्याआधीच दि १२.३.०९ रोजी कौटुंबिक न्यायालय बांद्रा येथे घटस्फोटाचा अर्ज केला असे देखील अर्जदार म्हणते. अशा प्रकारे सामनेवाल्यांनी शारिरिक व मानसिक त्रास देउन गरोदरपणाच्या काळात घरातून हुसकावून लावले असे अर्जदार म्हणते. त्यानंतर देखील दि १४.७.०९

रोजी अर्जदार क्र. २ श्रेयस याचा जन्म झाल्यावर प्रयत्न करून देखील नांदण्यास स्वीकारले नाही व अन्नवस्त्राची कोणतीही काळजी घेतली नाही असे अर्जदार म्हणते.

१०. सामनेवालाने त्याच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात अर्जदाराचे सर्व म्हणणे खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने अर्जदाराची सर्व कथने शपथेवर नाकारली आहे. प्रत्यक्षात अर्जदारच सामनेवाल्यांवर चिडचिड व राग करायची व दुखण्यामुळे झोपून राहयची असे सामनेवाले म्हणतात. लग्नानंतर मुंबईला नांदायला आल्यावर रितसर देवदर्शन घेतले होते तसेच अर्जदाराला अचानक पोटात दुखू लागल्याने जॉय हॉस्पीटल येथे उपचार दिले होते असे देखील सामनेवाले म्हणतात. अर्जदाराला एकत्र नांदत असताना गरजेनुसार कपडे घेउन दिले तसेच वेगवेगळया देवदर्शनाला नेले गावी नेले असे देखील सामनेवाले म्हणतात. परंतु अर्जदार स्वत: जास्त शिकलेली आहे असे म्हणून बरोबरी होउ शकत नाही असे सामनेवाला क्र १ ला म्हणत असे असे सामनेवाले यांनी म्हटले आहे. अर्जदार नेहमी संशय घेत असे व इतर मुलींशी संबंध असल्याचे म्हणून अपमानित करीत असे असे सामनेवाला म्हणतात. ऑगस्ट २००८ मध्ये अर्जदाराला बरे नसल्यामुळे जॉय हॉस्पीटलमध्ये उपचार दिले व त्या काळात तिला तिच्या वडिलांनी फोन घेउन दिला होता व त्यामुळे ती सतत माहेरच्यांशी बोलत असे असे सामनेवाला म्हणतात. प्रत्यक्षात अर्जदाराने तिचे सोन्याचे मंगळसूत्र हरवल्याचे सांगितले होते असे देखील सामनेवाले म्हणतात. दि. ३०.१०.०८ रोजी अर्जदार दिवाळी सणासाठी भावाबरोबर माहेरी गेली व दागिने हरवू नयेत म्हणून काढून दिले होते असे सामनेवालांनी म्हटले आहे. अर्जदाराच्या वडिलांना निवडणूक लढवायची असल्याने ते अर्जदाराल पुढे करून सतत दोन लाखाची मागणी करीत होते व तसे न केल्याने गहाण ठेवण्यासाठी दागिने मागत होते असे देखील सामनेवालांनी म्हटले आहे. दागिने न दिल्यामुळे अर्जदार घरच्यांशी सतत वाद करीत असे असे त्यांचे म्हणणे आहे. दि. १८.१२.०८ रोजी अर्जदाराला अचानक पोटात दुखायला लागल्याने तिला जवळच्या महिला डॉक्टरांकडे उपचार दिले होते असे देखील सामनेवाला म्हणतात. दि. ४.१.०९ रोजी बहिणीच्या पोटातील मुल मयत झाल्याने तिला दवाखान्यातून घरी सोडले असता अर्जदार काम नको म्हणून दि. ५.१.०९ रोजी माहेरी निघून गेली व तेव्हापासून ती तेथेच राहत आहे असे सामनेवालाचे म्हणणे आहे. दि. २६.३.०९ रोजी अर्जदाराने भारतीय दंड संहिता कलम ४९८ अ प्रमाणे सामनेवालांवर

गून्हा दाखल केला असे देखील ते म्हणतात. त्यानंतर अर्जदाराला मुलगा झाला व दि १३.४.११ रोजी तिने पूणे येथील न्यायालयात घरगुती हिंसाचाराच्या कायद्याखाली अर्ज दाखल केला परंत तो अधिकार क्षेत्र नसल्याने न्यायालयाने काढून टाकला असे सामनेवालांनी म्हटले आहे.

११. सामनेवाला क्र. १ च्या पुराव्याला त्याची बहिण मनिषा (सा.सा.क्र.२) हिने पुष्टी दिली आहे. या साक्षीदाराच्या म्हणण्यानुसार प्रत्यक्ष अर्जदारानेच त्यांचा मानसिक, शारिरिक, भावनिक व आर्थिक छळ करण्याच्या हेतुने बिन बुडाचे आरोप केले आहे. दि. ५.१.०९ रोजी अर्जदार किरकोळ कारणावरुन चिडचिड करुन निघून गेली असे ही साक्षीदार म्हणते. त्या काळात नवव्या महिन्यात अचानक पोटातील मूल मयत झाल्याने त्रास होत होता व त्यावेळेस माहेरी आले होते असे ही साक्षीदार सांगते. अशा परिस्थीतीमध्ये अर्जदार भावाला फोन करुन माहेरी निघून गेली होती असे ही साक्षीदार सांगते. अर्जदाराने भारतीय दंड संहिता कलम ४९८अ नुसार खोटया आशयाची केस करुन त्रास देण्याचा प्रयत्न केली असे देखील ही साक्षीदार म्हणते. खरे पाहता स्वतःच्या घरातील कामातून व प्रापंचिक जबबादारीतून कधीही अर्जदार हिच्या संसारात लक्ष दिले नव्हते असे ही साक्षीदार सांगते.

१२. दोन्ही बाजूंचा पुरवा वाचल्यानंतर असे आढळते की अर्जदाराने तिचा विवाह पसंतीने झाल्याचे मान्य केले आहे. तसेच दि. २६.८.०८ रोजी पोटात दुखू लागल्यामुळे सामनेवाला क्र. १ तिला जवळच्या डॉक्टरांकडे घेउन गेला होता हे देखील अर्जदार मान्य करते. तेथे नेउन फरक न पडल्यामुळे जॉय हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले होते ही बाब देखील अर्जदार मान्य करते. हॉस्पीटलचे बील सामनेवाला क्र १ ने भरले होते हे देखील अर्जदार मान्य करते. दि. १.१०.०८ रोजी सणानिमित्ताने माहेरी आले होते असे देखील अर्जदाराने मान्य केले आहे व त्याचदिवशी चुलती व चुलत्यांनी परत सासरी आणून सोडले होते असे देखील ही साक्षीदार सांगते. दि. ३०.१०.०८ रोजी भाउ विनायक याच्यासोबत माहेरी आले होते ही बाब अर्जदाराने मान्य केली आहे. अर्जदार दिवाळी सणानंतर सासरी आल्यावर सामनेवाला क्र १ ते ३ यांनी मारहाण केली होती असे म्हणते परंतु त्याबददल पोलिस ठाण्यात तक्रार दिली नाही असे सांगते. तसेच सामनेवालांनी मारहाण केल्याबददल तिच्याकडे लेखी पुरावा नसल्याचे अर्जदाराने स्पष्ट मान्य केले आहे. सन २००८ मध्ये सामनेवाल्यांकडून पैश्यांची

मागणी झालेल्या अभिकथित घटनेनंतर पोटात दुखू लागले होते व त्यावेळेस सामनेवालांनी देवनार येथील डॉ मिनाक्षी राउत यांच्याकडे नेले होते ही बाब देखील अर्जदाराने मान्य केली आहे. अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना नक्की कधी, कोणासमोर, किती वाजता घडल्या हे अर्जात नमूद केले नसल्याचे देखील स्पष्टपणे मान्य केले आहे. तसेच घरगुती हिंसाचाराच्या बाबतीत स्वत:च्या शब्दाशिवाय तिच्या कडे इतर पुरावा नाही ही बाब देखील तिने मान्य केली आहे.

१३. अर्जदाराने नि. २९ सोबत सामनेवालाच्या जमीनीबाबत सात बाराचे उतारे सादर केले आहे. परंतु कौटुंबिक हिंसाचाराच्याबाबत भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ खालील फिर्याद व्यतिरिक्त संबंधित काळात घरगुती हिंसाचार घडला हे दाखवण्याकरता दूसरे कोणतेही कागदपत्र जोडलेले नाही. याठिकाणी अर्जदाराने भारतीय दंड संहिता कलम ४९८ अ या संबंधातील तक्रार तिच्या म्हणण्यानुसार तिला दि. ४.१.०९ रोजी हाकलून दिलेले असताना उशिराने २६.३.०९ रोजी केल्याचे दिसते. अर्जदाराने सामनेवालांकडून घरगुती हिंसाचाराच्या घटना दाखवण्यासाठी एकही वैद्यकिय दाखला जोडलेला नाही ही बाब प्रकर्षाने जाणवते. अर्जदाराने सामनेवाल्यांवर शिवीगाळ व मारहाण करण्यासंदर्भात गंभीर आरोप केले आहेत. एखादी मारहाण झाली असता त्यासदंर्भात उपचार घेतल्याचे कागदपत्र संबंधित डॉक्टर किंवा रूग्णालय येथून मिळवून न्यायालयासमोर हजर करणे शक्य होते. परंतु अशा प्रकारचे कोणतेही कागदपत्र न्यायालयासमोर दाखल केलेले दिसत नाही. उलटपक्षी अर्जदाराने स्वत:हून सामनेवालांनी तिला गरज पडली त्यावेळेस वेळोवेळी डॉक्टरांना दाखवल्याचे व रूग्णालयात दाखल केल्याचे मान्य केले आहे. अशा परिस्थीतीमध्ये सामनेवालांनी नक्की काय शारिरिक त्रास दिला किंवा शिवीगाळ करून मानसिक त्रास दिला याचा बोध होत नाही.

१४. अर्जदाराने दागिन्यांच्या बाबतीत सामनेवाल्यांवर स्त्रीधन परत न दिल्याबाबत जरी आरोप केले असले तरी हे आरोप देखील योग्य त्या कागदपत्रांनी शाबित केलेले नाहीत. सामनेवाल्यांच्या म्हणण्यानुसार लग्नात दिलेले दागिने त्यांनी कुर्ला न्यायालयातील प्रकरणामध्ये दि. २९.१०.१३ रोजी परत केलेले आहेत. या बाबीला पुष्टी देण्याकरता सामेनवाल्यांनी कुर्ला येथील न्यायालयाने साक्षांकित

केलेली अर्जदाराच्या पुराव्याची प्रत नि. ४१ दाखल केली आहे. या पुराव्यामध्ये अर्जदाराने दागिने आरोपींकडे होते तसेच पोलिसांनी जप्त कलेले दागिने दाखवल्यास ओळखू शकते असे पुराव्यातील परिच्छेद क्र १० मध्ये म्हटलेले आहे. अर्जदाराने या दागिन्यांव्यतिरिक्त साडे तीन तोळयाचे मंगळसूत्र व तीन तोळयाचा हार असा ऐवज ती परत मागत आहे असे जादा पुरावा देउन म्हटले आहे. हे स्त्रीधन सासरच्या लोकांकडे आहे असे तिचे म्हणणे आहे. या बाबतीतील न्यायालयासमोरील पुरावा पाहता तो संदिग्ध स्वरूपाचा दिसतो. याआधीच उल्लेख केल्याप्रमाणे सामनेवाल्यांनी सर्व दागिने कुर्ला येथील प्रकरणात दि. २९.१०.१३ रोजी परत दिल्याचे म्हटले आहे. अशा प्रकारच्या संदिग्ध स्वरूपामध्ये सामनेवाल्यांनी अर्जदारावर आर्थिक स्वरूपाचा घरगुती हिंसाचार केला या तात्पर्याला पोहोचता येणार नाही. नक्की स्त्री धनाच्या दागिन्यांचे काय झाले व सध्या कोणाकडे आहेत हा तपासाचा भाग आहे. याबाबत सामनेवाल्याचा उलटतपास पाहता त्याने लग्नात अर्जदाराच्या अंगावर घातलेले दागिने अर्जदाराने स्वत:हून आईकडे काढून दिले होते असे म्हटल्याचे दिसते. ते दागिने पत्नी म्हणून अर्जदाराच्या अंगावर असणे गरजेचे आहे अशा स्वरूपाचा पुरावा या साक्षीदाराने दिलेला आहे. परंतु ते दागिने वारंवार अर्जदारोन मागितले होते परंतु ते तिला दिले नाही ही बाब अर्जदार नाकारतो. स्त्री धन म्हणून अर्जदाराच्या अंगावर घातलेले दागिने परत द्यायला तयार आहे अशी प्रांजळ कबूली सामनेवाला क्र १ ने दिली आहे. अर्जदाराने पुन्हा नांदण्याचा प्रयत्न केला होता असे जरी म्हटले असले तरी त्यासंदर्भात सामनेवाल्यांना नोटिस दिली होती का हे सांगितलेले नाही. तसेच एखादा त्रयस्थ साक्षीदार तपासलेला नाही. या सर्व बाबी योग्यरितीने तपासल्या असता सामनेवालांनी अर्जदारावर घरगुती हिंसाचार केला होता असे कोठेही दिसून येत नाही. केवळ घटस्फोटासाठी मुदतीच्या आधी अर्ज करणे मुलाचा जन्म झाल्यानंतर पत्नीने प्रयत्न करून देखील गृह वादाची पार्श्वभूमी असताना पुन्हा एकत्र न नांदणे याला घरगुती हिंसाचार म्हणतता येणार नाही. सबब मी मुददा क्र १ चे उत्तर नकारार्थी देतो.

**मुददा क्र २ बाबत**

१५. पीडित महिलेला घरगुती हिंसाचाराच्या कायद्याखाली या कायद्यानुसार तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला होता हे सिध्द केले असता त्याखालील आदेश

मिळवता येतील. केवळ कौटुंबिक वादातून झालेला बेबनाव व त्यातुन झालेली पती पत्नीची फारकत याचा आधार घेउन घरगुती हिंसाचाराच्या कायद्याखालील पत्नीला पोटगी मागता येणार नाही. तसेच पत्नीला हिंदू पोटगी कायदा तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगीची तरतूद असताना केवळ तांत्रिक मुद्यावर अर्ज मंजूर करणे अयोग्य होईल. सदर प्रकरणामध्ये अर्जदार सामनेवाल्यांविरुध्द त्यांनी कौटुंबिक हिंसाचार केला होता हे सिध्द करण्यास असफल ठरली आहे. किंबहूना या प्रकरणामध्ये सामनेवलाने स्वत:हून अर्जदाराचे त्यांनी तिच्या अंगावर घातलले स्त्रीधन परत देण्याची कबूली दिली आहे. तसेच सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व मुलाचे पालनपोषण करणे ही त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असल्याचे जरी मान्य केले असले तरी ही कायदेशीर बाजू आहे. अशा प्रकारच्या काही सूचकांच्या स्वीकृतीला सामनेवालांविरुध्द वापरून त्यांनी घरगुती हिंसाचार केला होता असे म्हणणे अयोग्य ठरेल. सामनेवालांचे विरुध्द मारहाण केल्यासदंर्भात किंवा इतर कोणताही छळ केल्यासंदर्भात ठोस पुरवा नसताना केवळ कौटुंबिक वादावरुन त्यांना दोषी ठरवून त्यांच्या विरुध्द कोणताही आदेश करणे हे अन्यायकारक होईल. अर्जदाराने ती शिक्षीत असल्याचे मान्य केले आहे. तसेच ती सरपंच पदावर काम करते हे देखील मान्य केले आहे. अशाप्रकारे अर्जदार स्वत:चा सांभाळ करण्यास देखील समर्थ दिसते. अर्जदार मुलाला घेउन राहत असल्याचा विचार करून त्या आधारे अर्ज मान्य करणे अयोग्य होईल. मुळात घरगुती हिंसाचार योग्यरितीने सिध्द होत नसल्याने केवळ भावनिक दृष्टया अर्जाचा विचार करणे चूकीचे ठरेल. सामनेवालाने तो वोडाफोन कंपनीत काम करत असल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. त्याने स्वत:हून तो शोम कंपनीत आफिस बॉय म्हणून काम करीत असल्याचे व त्याला रू.५०००/- प्रतिमाल पगार मिळत असल्याबददल दाखला हजर केला आहे. तसेच अर्जदाराकडे जमीनी असल्यामुळे किंवा तो स्वत:चा चरितार्थ चालवण्यास नोकरी करीत असल्यास घरगुती हिंसाचार सिध्द होत नसताना त्याचेविरुध्द अर्जदाराच्या पोटगीचा आदेश करता येणार नाही. अशा परिस्थीतीमध्ये या कायद्याखालील पोटगीसाठी किंवा नुकसान भरपाईसाठी कोणतीही तरतूद अर्जदाराने मागितल्याप्रमाणे तिला लागू करता येणार नाही अशा नम्र मताला मी पोहोचतो . म्हणून मुददा क्र २ चे उत्तर नकारार्थी देतो.

**मुददा क ३**

१६. संपूर्ण अर्ज प्रकरणातील पुराव्याचा सारासार विचार करता असे आढळते की अर्जदाराचा अर्ज घरगुती हिंसाचाराच्या ठोस पुराव्याअभावी मान्य करण्याजोगा नाही. मुळात घरगुती हिसांचार योग्यरितीने सिध्द न झाल्यामुळे घरगुती हिंसाचार कायद्याखाली पोटगी, नुकसान भरपाई तसेच राहण्यासाठी सोय या बाबतीतील इतर तरतूदी अर्जदार महिलेला उपलब्ध्रा करून देता येणार नाही. सबब एकूण विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

(१) अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात येतो.

(२) खर्चाबाबत आदेश नाही.

(३) न्यायनिर्णयाची एक प्रत अर्जदाराला विनामूल्य द्यावी.

दिनांक : १५.०३.२०१७

(अ. मा. पाटणकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पारनेर

I affirm that the contents of this PDF file judgment are same word to word as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | Thorat U. B. |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Parner |
| Date of dictation | 15-03-2017 |
| Judgment signed by PO on | 15-03-2017 |
| Judgment uploaded on | 16-03-2017 |